

# मराठे म्हणाले, होऊ द्या चौकशी

धक्का!! सुराज्य सोलापूर

शनिवार, दि. २३ मार्च २०२४ । पान १२

# नको मराठ्यांची बदनामी कळू द्या षड्यंत्र



१९८० पासून मराठ्यांची आरक्षणासाठी लढाई चालू आहे मराठा आरक्षणाबाबत मनोज जरंगे पाटलांनी मोठी भूमिका घेतली असतानाच जोपर्यंत मराठा आरक्षणाचा प्रश्न मिटत नाही तोपर्यंत मते मागायला येणाऱ्या खासदार आमदारांना रस्त्यावर फिरू देणार नाही असा इशारा मराठी क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक रामभाऊ गायकवाड यांनी दिला

काल सरकोली तालुका पंढरपूर येथे आमदार प्रणिती शिंदे यांच्या गाडीवर हल्ला झालेलाच नाही, हल्ला झाला हे खोटे आहे आहे त्याची कुठेही नोंद नाही हल्ला झाला असल्यास मराठा समाज जाहीर माफी मागेल. पण मराठा आरक्षणाच्या आडून प्रणिती शिंदे या मराठा आंदोलकांना बदनाम करीत आहेत. प्रणिती शिंदे यांनी म्हटले होते की, माझ्यावर झालेला हल्ला मराठा आंदोलनाच्या मागील भाजपा कार्यकर्त्यांनी केला आहे. पण सरकोलीमध्ये प्रणिती शिंदे यांची गाडी ज्या कार्यकर्त्यांनी अडवली त्या कार्यकर्त्यांनी देवेंद्र फडणवीस यांना अडवले होते. त्या आंदोलनात वेळेस त्यांना अडवले म्हणून दोन-दोन महिने जेलमध्ये बसले होते, त्याच मराठा आंदोलन कार्यकर्त्यांनी प्रणिती यांची गाडी गावात आल्यानंतर आमदार प्रणिती शिंदे यांना मराठा आरक्षणाच्या योगदानाबद्दल विचारले. तुम्ही मराठा समाजासाठी काय योगदान दिले एवढेच विचारले होते. ते भाजपचे कार्यकर्ते कसे होऊ शकतात? ते मराठा आंदोलक आहेत त्यामुळे प्रणिती शिंदे यांनी सकल मराठा समाजाची जाहीर माफी मागावी अन्यथा त्यांना सोलापूर मतदार संघातील एकाही गावात सकल मराठा समाज फिरू देणार नाही असा धमकी वजा इशारा प्रणिती ताई शिंदे यांना सकल क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक रामभाऊ गायकवाड यांनी दिला.

✔ पंढरपूर-सोलापूर/प्रतिनिधी

**पंढरपूर तालुक्यातील सरकोली येथे काल रात्री सकल मराठा तरुणांनी आमदार प्रणिती शिंदे यांना गावात येण्याला हरकत घेऊन मराठा आरक्षणासंबंधी जाब विचारण्याचा प्रयत्न केला होता. यादरम्यान आमदार प्रणिती शिंदे आणि सकल मराठा बांधव यांच्यामध्ये मोठी शाब्दिक चकमक झाली होती. या घटनेनंतर याप्रकरणाला आता राजकीय रंग फासण्याचा प्रकार होत असताना सकल मराठ्यांच्या भावना तीव्र झाल्या आहेत. कालच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर, मराठ्यांना बदनाम करण्याच्या आमदार प्रणितींच्या भूमिकेवर आज मराठ्यांनी पंढरपूर आणि सोलापुरात पत्रकार परिषदेत घेऊन आमदार प्रणितींना माफी मागण्याबद्दल सांगत लोकसभेच्या मतदार संघात फिरू न देण्याचा पंढरपूरचे राज्य समन्वयक रामभाऊ गायकवाड, आरक्षणाचे सोलापुरातील नेते सोमनाथ राऊत, तसेच राम गायकवाड यांनी इशारा दिला आहे.**



## हल्ल्याचा समर्थन करणार नाही : जरांगे

आमदार प्रणिती शिंदेंवर हल्ला करण्याच्या प्रकरणाचं मी समर्थन करणार नाही. माझे मराठे असे करुच शकत नाहीत असे मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी आज प्रसारमाध्यमांना सांगितलं. या हल्ल्याच्या पाठीमागे दुसरं काही असू शकतं. प्रणिती शिंदे यांच्यावर हल्ला कोणी केला? का केला? यासंदर्भात मला अद्याप सविस्तर माहिती नाही,असेही ते म्हणाले.

## सकल मराठ्यांचे प्रणितींना थेट सवाल

- सरकोलीमधील हल्ल्याप्रकरणी कोणत्या पोलीस ठाण्यात नोंद का केली नाही ?
- हल्ल्यात गाडी फोडलीच नाही, तेव्हा ती फोडल्याचे प्रसारमाध्यमांपुढे खोटे का सांगितले ?
- मराठा आरक्षणासंबंधी तुम्ही काय केले हे सांगा, त्यासंबंधीच्या पाठपुराव्याच्या क्लीप दाखवा एवढेच मराठे विचारत होते, तरीपण महिला आमदारावर हल्ला केला, अशी खोटी आणि दिशाभूल करणारी, मराठ्यांची बदनामी होईल, असे वातावरण निर्माण करणारी खोटी स्टेटमेंट माध्यमांना का दिली?
- मराठा आरक्षणाच्या मागणीवर पुढाऱ्यांना गावबंदी केली असताना, आमदार प्रणिती शिंदे यांनी मराठ्यांच्या भावनांची कदर न करता विरोधक झुगारून एवढे गावात येण्याची मर्दुमकी गाजविण्याचे कारणच काय?
- मराठा आरक्षणाला पाठिंबा दिल्याची क्लीप दाखवा, असे विचारत गाडीला घेराव घातला असताना गाडी फोडली असा दावा का केला?
- सरकोलीत झालेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर, आमदार प्रणिती शिंदे यांनी पोलिसांत अद्याप तक्रार केलेली नाही, तरीपण याप्रकरणाची चौकशी होण्याची गरज आहे. लोकसभेच्या निवडणुकीत किंमत मोजायला लावण्याच्या तयारीत आहे, अशातच मराठा समाजाला बदनाम करण्याचे षड्यंत्र कोणी रचतंय का? याचा शोध घेण्याची गरज असल्याचे मराठा नेते सोमनाथ राऊत, राम गायकवाड यांनी सांगितले.




## ज्योती वाघमारेंची प्रणितींवर तोफ
## घाणेरड्या राजकारणातून मराठ्यांची बदनामी नको

सरकोलीच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे शिवसेना गटाच्या प्रदेश प्रवक्त्या प्रा. ज्योती वाघमारे यांनी अत्यंत जळजळीत शब्दात आमदार प्रणिती शिंदे यांचा खरपूस समाचार घेतला. प्रणिती यांच्या हुकूमशाही, दमदाटी आणि हिटलरशाहीचा निषेध असो असे त्या म्हणाल्या. त्या म्हणाल्या, प्रणितीताई, तुमच्यासारख्यांचं असंच असतं तुमच्या गाडीवर, माडीवर अन् कुत्र्यावरही प्रेम असतं. पण प्रणितीताई तुमच्या गाडीला हात लावला म्हणून तुम्हाला एवढा राग येत असेल तर ज्या युवकांनी मराठा आरक्षणासाठी आत्महत्या केल्या. त्यांच्या मायमाऊल्यांच्या आतडीला किती पीळ पडत असेल? त्यांच्या काळजाला किती वेदना होत असतील? ते तुम्हाला अजिबात समजणार नाही. ज्यावेळी मराठा आंदोलक तुमच्या घरी आले होते, त्यावेळीही तुम्ही माझ्याच घरी का आलात म्हणून अपमानास्पद वागणूक देऊन अरेरावीची भाषा वापरली होती, हे मराठा समाज विसरलेला नाही, असेही प्रवक्त्या वाघमारे म्हणाल्या. खरं तर लोकप्रतिनिधींना प्रेम आणि रोष या दोन्ही गोष्टी चांगल्या हाताळता यायला पाहिजेत.प्रणितीताईंकडे संयमाचा अभाव आहे. एक दिवस अतिराग आणि भीक माग अशीच त्यांची अवस्था होणार आहे. तुमच्या गाडीला हात लागला म्हणून तुमची लाख मोलाची गाडी बाटणार होती का? बुढी का बाल विकणाऱ्या तुमच्या वडिलांकडे गाडी-माडी कोठून आली? कोणामुळे आली? याच्या खोलात आम्हाला जायचे नाही.घाणेरडे राजकारण करण्यासाठी, कोणा एका पक्षाचे नाव घेऊन तुम्ही मराठा समाजाला बदनाम करणार असाल तर सोलापूरकर तुमच्यावर बुढी के बाल विकायची पाळी आणतील हे तुम्ही विसरू नका, अशी बोचरी टीका वाघमारे यांनी केली.

## धैर्यशीलभैयांनी मौन सोडलं पण...

✔ **नातेपुते** : माढा लोकसभेची उमेदवारी कोणत्याही परिस्थितीत लढवायचीच या इर्षेने पेटलेले धैर्यशील मोहिते-पाटील आणि त्यांचे कुंटुंबिय तसेच समर्थक सध्या माढा लोकसभेच्या मतदार संघात दौऱ्यावर आहेत. आज शुक्रवारी ते माण तालुक्याच्या दौऱ्यावर होते. या दौऱ्यात सकाळी त्यांनी श्री क्षेत्र शिखर शिंगणापूर येथे त्यांनी शंभू महादेव यांचे दर्शन घेतले. यावेळी त्यांना प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी उमेदवारीबद्दल विचारले तेव्हा १२ एप्रिलला माझ्या उमेदवारीबद्दल माहिती मिळेल असे त्यांनी सांगितले.




विशेषत्वे, लोकसभा निवडणुकीबद्दल जेव्हा जेव्हा धैर्यशील मोहिते-पाटील यांना विचारले तेव्हा त्यांनी जनमत घेतोय एवढेच उत्तर देऊन दौऱ्यादरम्यान देत मौन बाळगणं पसंत केलं. आज उमेदवारीवर मौन थोडसं सोडलं. पण उमेदवारीबद्दलच्या भूमिकेची गुप्तता जाणीपूर्वक ठेवली.

शंभू महादेव यांचं दर्शन घेऊन त्यांनी माण तालुक्याच्या दौऱ्याना सुरवात केली. दर्शन घेण्याच्या प्रसंगी फलटणचे अनिकेतराजे रामराजे नाईक-निंबाळकर आवर्जून उपस्थित होते.

### जनतेचा उत्तम प्रतिसाद : शीतलदेवी मोहिते-पाटील

जनमताचा कौल घेण्याच्या पार्श्वभूमीवर, शीतलदेवी मोहिते-पाटील या आज पंढरपूर तालुक्याच्या दौऱ्यावर होत्या. शेगाव दुमाला येथे त्यांनी प्रसारमाध्यमांना माहिती दिली. मोहिते-पाटील परिवाराचा हा प्रचार दौरा नाही. आम्ही जनमताचा कौल जाणून घेत आहेत. आम्हा सर्वांना उत्तम प्रतिसाद मिळतोय, असे शीतलदेवी मोहिते-पाटील यांनी सांगितले. जनमतचा कौल घेऊनच पुढचं धोरण निश्चित करा, असे विजयदादा यांचं सांगणं आहे. त्यानुसार, जनतेचा कौल घेऊनच आम्ही पुढची दिशा ठरविणार आहोत, असेही त्या म्हणाल्या.

## भाजपा उमेदवारीनं अडलं घोडं | कार्यकर्त्यांना समजेना कोडं



संजय आठवले

✔ **मोहोळ** : काँग्रेस आघाडीकडून प्रणिती शिंदे यांची उमेदवारी जाहीर झाली आहे मोहोळ विधानसभा मतदारसंघात शिंदे यांच्या सभेमुळे कार्यकर्त्यांना ऊर्जा मिळाली असली तरी शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे कार्यकर्ते अद्यापही प्रचारामध्ये सक्रिय झालेले दिसत नाही, अशी मोहोळ मतदार संघाची अवस्था आहे.

देशभरात सर्वत्र लोकसभेचे वारे वाहू लागले आहे. आमदार प्रणिती शिंदे यांनी अनगर भाग वगळता जवळ जवळ तालुक्यातील गावा-गावात जाऊन भेटी गाठी घेतल्या आहेत मोहोळ विधानसभा मतदार संघातही लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने, काँग्रेस आणि भाजपाचे कार्यकर्ते जमेल तशी आपल्या पद्धतीतले व्यूहरचना आखू लागले आहेत. मोहोळ विधानसभा मतदार संघात नुकत्याच झालेल्या माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे तसेच ज्येष्ठ विचारवंत निरंजन टकले यांच्या सभेमुळे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना 'ऊर्जा' मिळाली असली तरी अजूनही त्यांनी मरगळ झटकलेली दिसत नाही. अद्याप मोहोळ मतदार संघात काँग्रेस, शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस व उद्धव ठाकरे यांची शिवसेना यांचे मनोमीलन झालेले दिसत नाही. उमेदवार ठरूनही अजूनही त्यांची आघाडी मतदार संघात दिसत नाही.

आमदार प्रणिती शिंदे ग्रामीण भागात प्रचार करीत असताना मराठा आंदोलकांच्या रोषाला त्यांना सामोरे जावे लागले आहे. तर बऱ्याच ठिकाणी आम्हीही तुमच्या बाजूने आहोत, आरक्षण मिळालेच पाहिजे, या मताशी सहमत आहोत असे म्हणत त्या आंदोलक कार्यकर्त्या समवेत त्या घोषणाबाजी करीत त्यांच्यात मिसळल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

भाजपाचे संघ परिवाराचे कार्यकर्ते आपापल्या भागातील मतदारांच्या याद्या घेऊन किती मतदार पोलिंगला नेऊ शकतो किती बाहेरगावी आहेत? कोणाला कोणामार्फत निरोप पाठवावे लागतील, याबद्दलची मोर्चेबांधणी करू लागले आहेत. तर भाजपाचे काही पदाधिकारी आमच्या भागाला निधी कमी दिला म्हणून श्रेष्ठीवर राग व्यक्त करण्यातच गुंतले आहेत.

रिपाइंचे कार्यकर्ते भाजपापासून अद्याप लांबच आहेत. रिपाइला सोलापूर अन् शिर्डी लोकसभेची उमेदवारी मिळाली पाहिजे, यावर ते ठाम आहेत. याबाबत भाजपाकडून काहीही हालचाली होताना दिसत नाहीत. त्यामुळे वेगळा विचार करण्याच्या हालचाली चालू आहेत. मागे एक वेळा रामदास आठवले यांच्या आदेशाने राज्यभर दोन दिवसात उमेदवारी अर्ज दाखल झाल्याचे ऐकिवात आहे. यावेळी काय होणार ? हे पाहणेदेखील तितकेच औत्सुक्याचे आहे.

आता जरी अशी परिस्थिती असली तरी भाजपाकडून उमेदवार अद्याप जाहीरच झाला नाही, उमेदवार ठरल्यानंतर निवडणुकीची खरी रंगत वाढणार आहे.

## जाईल तेथे अन्यायच

**भारतीय जनता पक्ष जो उमेदवार देईल त्याला निवडून आणण्यासाठी मोहिते-पाटील परिवाराने मेहनत घेतली. सर्व समर्थकांना कार्यरत केले. मात्र तरीही यंदा उमेदवारीत डावलले गेल्याने हा परिवार अस्वस्थ झाला आहे. त्यामुळे जाईल त्या पक्षात त्यांच्यावर अन्यायच झाल्याची भावना व्यक्त होत आहे.**



२०१९- राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून वेळोवेळी डावलले जाण्यामुळे मोहिते-पाटील व समर्थकांनी भाजप या पक्षात प्रवेश केला.२०१९ मोहिते-पाटलांच्या पारंपारिक विधानसभा मतदार संघात ऐनवेळी बाहेरचा उमेदवार लादला गेला. अटीतटीच्या निवडणुकीत त्याला निवडून आणण्याची जबाबदारी मोहिते पाटलांनी घेतली आणि राम सातपुते या नवख्या उमेदवाराला विजय प्राप्त करून दिला.२०१९ ला होणाऱ्या लोकसभा निवडणुकीसाठी सोलापूर जिल्ह्यात वर्चस्व असणाऱ्या मोहिते पाटील कुटुंबातील सदस्य किंवा समर्थक यांचा विचार न करता फलटण मतदार संघातील रणजितसिंह नाईक-निंबाळकर या उमेदवाराची निवड करण्यात आली. नवीन पक्षाचा पहिलाच आदेश मानून याही उमेदवाराला मोहिते-पाटील यांनी प्रचंड मेहनतीने निवडून आणले. मोहिते-पाटलांच्या खासदारकीच्या उमदेवारीला मोहिते-पाटलांना डावललेले.



नगरपरिषद व नगरपंचायत म्हणून नुकत्याच उदयाला आलेल्या महाळुंग -श्रीपूर,नातेपुते व माढा यांच्या निवडणुकीत मोहिते पाटील यांना विचारात न घेता भाजपचे अधिकृत ए बी फार्म उमेदवारांना मोहिते पाटलांच्या परस्पर देण्यात आले. मोहिते-पाटील यांचा महत्त्वाकांक्षी कृष्णा भीमा स्थिरीकरण हा प्रकल्प याच्याबाबत वरिष्ठ पातळीवरून भाजपकडून कोणत्याही हालचाली झाल्या नाहीत व ज्या बैठका झाल्या यामध्ये मोहिते-पाटलांना स्थान दिले गेले नाही. खासदार असताना विजयसिंह मोहिते-पाटील यांनी मागण्या केलेल्या योजनांना मोहिते-पाटलांच्या परस्पर मान्यता देण्यात आल्या व त्याचे श्रेय विद्यमान खासदारांना देण्यात आले. वरिष्ठ पातळीवरून जणू यामध्ये मोहिते-पाटलांचा कोणताही वाटा नाही हेच दाखवण्याचा प्रयत्न अधोरेखित करण्यात आला.

**अस्तित्वाची लढाई :** १९९९ ते २०१९ या कालावधीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून मोहिते-पाटील यांना वेळोवेळी डावलण्यात आले. ज्या कार्यकर्त्यांना मोहिते-पाटील यांनी राजकारणात आणून स्वतःचे स्थान मिळवून दिले असे कार्यकर्ते मोहिते-पाटील यांना विरोध करू लागले. वरिष्ठ पातळीवर या गोष्टीची दखल न घेता उलट पक्षी याच विरोधकांना रसद पुरवण्याचे काम होऊ लागले. या उपर मोहिते पाटील यांचा संयमी असणारा स्वभाव, पक्षश्रेष्ठींविरुद्ध बंड न करण्याची तयारी यामुळे सत्ताकारणापासून मोहिते-पाटील थोडेसे दूर जाऊ लागले. ग्रामपंचायत,पंचायत समिती,जिल्हा परिषद इथपासून थेट संपूर्ण सोलापूर जिल्ह्यावर वर्चस्व असणारे मोहिते-पाटील यांचे राज्यासह जिल्ह्यातीलदेखील स्थान डळमळू लागले. जिल्ह्याच्या विकासापेक्षा मोहिते- पाटील यांना विरोध करणारी स्वतंत्र समविचारी आघाडी निर्माण झाली. मोहिते-पाटील कोणत्या पक्षात आहेत किंवा कोणत्या पक्षात होते यापेक्षा मोहिते-पाटलांना विरोध कोणत्या पातळीवर करता याची गोळा बेरीज विरोधक करू लागले. राष्ट्रवादीमध्ये मोहिते-पाटलांचे होणारे खच्चीकरण या त्रासाला कंटाळून २०१९ ला त्यांनी भाजप या पक्षाची निवड केली आणि राष्ट्रवादी पक्षात जे मोहिते-पाटील विरोधी गटाचे सुप्त राजकारण सुरू होते तेच पुन्हा नव्याने भाजपमध्ये सुरू झाले.साहजिकच या सर्व घडामोडीत मोहिते पाटलांचे सोलापूर जिल्ह्यातले वर्चस्व कमी होऊ लागले.ज्या पक्षात मोहिते- पाटील जातील त्याच पक्षाने मोहिते-पाटलांच्या समर्थकांना फोडण्याचे आणि विरोधकांना बळ देण्याचे काम सुरू केले.